## निशाणी क्र.१३३ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज आदेश ६ नियम १७ तसेच १५१ प्रमाणे वादी यांनी दाव्यामध्ये दुरुस्तीसाठी दाखल केला आहे.

०२. वादीचे असे कथन आहे की, दावा कलम अ.क्र.१ ब मधील अ.क्र.२ मधे दावा मिळकत "१२३२" असे लिहिणे ऐवजी नजरचुकीने व टायपिंग दोषाने "१२६२" असा चुकीचा क्रमांक टाईप केला गेलेला आहे. परंतू, सदर मिळकतीचे संपूर्ण वर्णन योग्यरित्या दाव्यात नमूद केलेले आहे. त्यामुळे दावा कलम अ.क्र.१ ब मधील अ.क्र.२ मधील मालमत्ता क्र."१२६२" ऐवजी "१२३२" असे नमूद करणेस परवानगी मिळावी अशी विनंती वादी यांनी केली आहे.

०३. प्रतिवादी यांनी नि.क्र.१३३ अर्जावरच म्हणणे सादर केले आहे की, सदरची दुरुस्ती १२ वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर मागणीसाठी असलेने अर्ज रद्द करण्यात यावा अन्यथा वादीस कॉस्ट करण्यात यावी अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

०४. अभिलेखाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांच्या विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादींविरुध्द निरंतर ताकीदीबाबत व परिणामी दाद म्हणून वादीचा मालकी हक्काचा दावा मिळकतीत असणारा कब्जा कायम होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादीच्या कथनानुसार नजरचुकीने व टंकलिखित चुकीमुळे दावा कलम अ.क्र.१ ब मधील अ.क्र.२ मधील मालमत्ता क्र."१२३२" ऐवजी "१२६२" असे नमूद झाले आहे. वादीने अभिलेखावर दाखल केलेल्या फे.नि.क्र.३ वरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता वादीने नि.क्र.१२ अन्वये खानापूर येथील ग्रा.मि.क्र.१२३२ चा

दि.०५.०२.२०१४ रोजीचा मुळ आकारणी उतारा दाखल केला आहे. सदरच्या कागदपत्रावरुन सन २०१३–१४ ते सन २०१६–१७ चे आकारणी उतारेनुसार ग्रा.मि.क्र.१२३२ नमूद असल्याचे दिसून येते. वादपत्रामध्ये नमूद सदरची चूक ही टंकलिखीत असल्याचे प्राथमिकदर्शी निदर्शनास येते. वादीचे मागणीप्रमाणे दुरुस्ती मंजूर केली तर प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही व दाव्याचे स्वरुपात बदल होणार नाही. सबब, वादी यांचा प्रस्तूत अर्ज वादी यांनी प्रतिवादी यांना र.रु.२००/– इतका भूर्दंड देण्याच्या अटीवर मंजूर करणे न्यायाचे होणार आहे.. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश करीत आहे;

**आदेश**

१. वादी यांचा निशाणी क्र.१३३ वरील अर्ज वादी यांनी प्रतिवादी यांना रु.२००/– (अक्षरी रुपये दोनशे मात्र) इतका भूर्दंड देणेचे अटीवर मंजूर करणेत येत आहे.

२. वादीने मागणीप्रमाणे विहीत मुदतीत दुरुस्ती करावी व दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करुन प्रतिवादी यांना देखील पुरविणेत यावी.

VAISHALI DIGAMBARRAO SHIRSE
Digitally signed by VAISHALI DIGAMBARRAO SHIRSE
Date: 2026.02.02 13:17:02 +0530

विटा. (श्रीमती.व्ही.डी.शिरसे)
दि.२७.०१.२०२६. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, विटा,
ता.खानापूर, जि.सांगली.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | G.U.Varude. |
| Name of the Court | :- | Smt. V.D. Shirse,<br>Jt.Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.,<br>Vita. Tal:-Khanapur. |
| Date of decision | :- | 27.01.2026 |
| Order signed by P.O. on | :- | 27.01.2026 |
| Order uploaded on | :- | 02.02.2026 |